# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/०७/२०२४ (बुधवार) सकाळ

## आरोपीसह ३ मोटार सायकली जप्त खापरखेडा पोलीसांची कार्यवाही

नागपुर ग्रामीण परिसरात मोटार सायकल चोरीच्या घटना वाढलेल्या असल्याने पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी. बी. पथकाने आरोपी – १) कैलास हरिचंद्र तांडेकर वय ३२ वर्ष, २) आकाश हरिचंद्र तांडेकर वय ३० वर्ष दोन्ही रा. विना संगम यांचेकडुन ७ मोटार सायकली जप्त करण्यात आलेली असुन यांचेसोबत चोरी चे गुन्हयात सहभाग असलेला फरार आरोपी विजय उर्फ विक्की सुरेश तुरतर रा. कोराडी याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथुन ताब्यात घेऊन सखोल विचारपुस केली असता त्याने आणखी तिन मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यामध्ये पोलीस स्टेशन खापरखेडा येथील २ मोटार सायकल व पोलीस स्टेशन कोराडी नागपुर शहर येथील १ मोटार सायकल जप्त केलेल्या आहे. पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी.बी. पथकाने दोन महिन्यात एकुण १० चोरीची मोटार सायकल जप्त करण्यात यश मिळविले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक, पोउपनि आरती नरोटे, डी. बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, कविता गोंडाने, कैलास पवार, अनिल वाढीवे, राजु भोयर, राजकुमार सातुर यांचे पथकाने पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर